महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस आणि गाईडस्, मुंबई संस्थेतील आस्थापनेवरील कर्मचारी यांना ७ व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचना लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : भास्कागा-२०१९/प्र.क्र. १३५/क्रीयुसे-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक २९ ऑगस्ट, २०१९

वाचा : १. शासन निर्णय वित्त विभाग क्र. वेपुर-२०१८/प्र.क्र. ४४/सेवा-९, दि. ०१ जानेवारी, २०१९
२. शासन अधिसूचना वित्त विभाग क्र. वेपुर-२०१९/प्र.क्र. १/सेवा-९, दि. ३० जानेवारी, २०१९
३. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दि. २० फेब्रुवारी, २०१९
४. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दि. ३० मे, २०१९

प्रस्तावना :

सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीवरील केंद्र शासनाचे शासन निर्णय विचारात घेऊन राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याकरीता श्री. के.पी.बक्षी, सेवानिवृत्त अप्पर मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ ची स्थापना करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशी शासनाने काही फेरफारासह स्वीकृत करण्याचा निर्णय संदर्भ-२ येथील शासन निर्णयान्वये घेतला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस आणि गाईडस, मुंबई येथील कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतन संरचना लागू करण्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा(सुधारित वेतन) नियम, २०१९ च्या संदर्भ क्र.३ अन्वये अधिसूचित केले आहेत. तसेच संदर्भ क्र. ४ च्या परिपत्रकानुसार प्रारंभिक वेतननिश्चितीबाबत व थकबाकी अदा करण्यासंदर्भात सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. त्या आधारे महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस आणि गाईडस्, मुंबई संस्थेतील आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : -

शासन असे आदेश देत आहे की, संदर्भ क्र. ३ अन्वये अधिसूचित केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ मधीन सुधारित वेतन संरचना व वेतननिश्चितीचे नियम तसेच संदर्भ क्र. ४ अन्वये वेतन निश्चिती व थकबाकी अदा करण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या सूचना सोबतच्या जोडपत्रातील महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस आणि गाईडस्, मुंबई संस्थेतील आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना (सुधारित वेतन संरचना) योग्य त्या फेरफारासह लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करण्यासाठी आवश्यक तो विकल्प हे आदेश निर्गमित झाल्याच्या २ महिन्यांच्या आत देण्यात यावा. एकदा दिलेला विकल्प अंतिम राहील.

३. या आदेशान्वये लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनामुळे होणारा अतिरिक्त खर्च महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस आणि गाईडस्, मुंबई संस्थेतील आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे वेतनासाठी मंजूर करण्यात येणाऱ्या ज्या लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात येतो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व त्या खालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांनी सुधारित अंदाज तयार करताना सदर अतिरिक्त खर्च विचारात घ्यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अ.नौ.संदर्भ क्र.२७४/२०१९/सेवा-९, दि. १६/०७/२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२९१५५०१४६५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.08.29 16:02:16 +05'30'

(राजेंद्र पवार)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) राज्य चिटणीस, महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस आणि गाईडस्, मुंबई
३) सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य(क्रीडा संचालनालयामार्फत)
४) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य(क्रीडा संचालनालयामार्फत)
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर
६) महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर
७) वित्त विभाग (व्यय-५) व (सेवा-९)/नियोजन विभाग (का १४७१), मंत्रालय मुंबई
८) कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०) सर्व वरिष्ठ कोषागार अधिकारी / जिल्हा कोषागार अधिकारी
११) निवड नस्ती, क्रीयुसे -३

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, जानेवारी ३०, २०१९ /माघ १० शके १९४०

(22) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

(22) **School Education and Sports Department Contd.**

(रक्कम रुपयांत/Amount in Rs.)

अ. क्र. / Sr. No.	पदनाम/ Designation	विद्यमान वेतन संरचना/ Existing pay structure		अभिप्राय
		वेतन बँड Pay Band	ग्रेड वेतन Grade Pay	
१	२	३	४	५
महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस् (अनुदानित)				
4.**Maharashtra State Bharat Scouts & Guides (Aided)**				
१.	राज्य चिटणीस/State Secretary	9300-34800	4400	S-15 : 41800-132300
२.	राज्य सहचिटणीस/ State Joint Secretary	9300-34800	4400	S-15 : 41800-132300
३.	राज्य संघटन आयुक्त (स्काऊट)/ State Organiser Commissioner (Scout)	9300-34800	4300	S-14 : 38600-122800
४.	राज्य संघटन आयुक्त (गाईड)/ State Organiser Commissioner (Guide)	9300-34800	4300	S-14 : 38600-122800
५.	राज्य प्रशिक्षण आयुक्त (स्काऊट) State Traning Commissioner (Scout)	9300-34800	4300	S-14 : 38600-122800
६.	राज्य प्रशिक्षण आयुक्त (गाईड) State Traning Commissioner (Guide)	9300-34800	4300	S-14 : 38600-122800
७.	लघुलेखक / Stenographer	9300-34800	4300	S-14 : 38600-122800
८.	सहाय्यक राज्य चिटणीस/ Asst.State Secretary	9300-34800	4200	S-14 : 38600-122800
९.	सहाय्यक राज्य संघटन आयुक्त/ Asst. State Organising Commissioner	9300-34800	4200	S-13 : 35400-112400
१०	सहाय्यक राज्य प्रशिक्षण आयुक्त / Asst. State Traning Commissioner	9300-34800	4200	S-13 : 35400-112400

११.	स्थापत्य अभियंता / Civil Engineer	9300-34800	4200	S-13 : 35400-112400
१२.	अधिक्षक/ Superintendent	9300-34800	4200	S-13 : 35400-112400
१३.	जनसंपर्क अधिकारी/ Public Relation Officer	9300-34800	4200	S-13 : 35400-112400
१४.	लेखापाल/Account	9300-34800	4200	S-13 : 35400-112400
१५.	जिल्हा संघटक (Scout/Guide)	5200-20200	2800	S-10 : 29200-92300
१६.	रोखपाल/ Cashier	5200-20200	2400	S-8 : 25500-81100
१७.	सहाय्यक लेखापाल/ Asst. Accountant	5200-20200	2400	S-8 : 25500-81100
१८.	वरिष्ठ लिपीक/ Senior Clerk	5200-20200	2400	S-8 : 25500-81100
१९.	टंकलेखक/ Typist	5200-20200	2000	S-7 : 21700-69100
२०.	कनिष्ठ लिपीक/ Junior Clerk	5200-20200	1900	S-6 : 19900-63200
२१.	वाहनचालक/ Driver	5200-20200	1900	S-6 : 19900-63200
२२.	नाईक/ Naik	5200-20200	1600	S-3 : 16600-52400
२३.	चौकीदार/Chowkidar	4440-7440	1300	S-3 : 15000-47600
२४.	शिपाई/ Peon	4440-7440	1300	S-3 : 15000-47600
टिप : शासन निर्णय क्र. भास्कागा-३०१८/प्र.क्र.१५१/क्रीयुसे-३, दि. ३० जुलै, २०१९ अन्वये जिल्हा संघटन, सहाय्यक संघटन आयुक्त, जिल्हा संघटक आयुक्त, जिल्हा गाईड संघटक व जिल्हा स्काऊट संघटक इत्यादी पदांचे वेगवेगळे पदनाम असून वेतन श्रेणी सारखी असल्यामुळे या पदांसाठी “जिल्हा संघटक (स्काऊट/गाईड)” असे एकच पदनाम करण्यात आले आहे.				